# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

———————————

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

———————————

गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या अनुदानाबाबत

**(१) ६४४ (०९-०४-२०२०). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शिक्षा अभियानामार्फत अनुदान मंजूर केले जाते या निकषांमध्ये बदल केल्याने गडचिरोली जिल्ह्यातील ९५८ जिल्हापरिषद शाळांचे अनुदान घटले असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील बहुतांश शाळा ग्रामीण व दुर्गम भागात असल्याने या भागात लोकसंख्या विरळ आहे त्यामुळे पटसंख्या सुद्धा कमी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शाळांना मागील वर्षीच्या नियमाप्रमाणे यावर्षीही अनुदान देण्यात येणार काय,
(४) असल्यास, याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) केंद्र शासनाकडून मंजूर तरतुदीनुसार संपूर्ण अनुदान प्राप्त झाले नाही. त्यामुळे उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत सर्व जिल्हा परिषद शाळांना निधी वितरित करण्यात आला.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या शालेय विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत**

**(२) ७३६ (०८-०४-२०२०). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इंग्रजी माध्यमाच्या शालेय विद्यार्थ्यांना दररोज पाठीवरून दप्तराचे ओझे वाहून नेल्यामुळे हाडांचे, मणक्यांचे व पाठ दुखी या सारख्या गंभीर आजारांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे नोव्हेंबर २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागाने सन २०१५ या वर्षात विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी सुरू केलेली मोहिम व करण्यात आलेल्या सुचना याची अंमलबजावणी न झाल्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या शालेय विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे वाढतच आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय , असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने इंग्रजी माध्यमाच्या शालेय विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शाळांना अनुदान देण्याबाबत आवश्यक तरतुदींची पुरवणी मागणी मंजुर करण्याबाबत**

**(३) ९३९ (१०-०४-२०२०). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अघोषित प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा व तुकड्या तसेच घोषित उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना अनुदान मंजुरीसाठी आवश्यक तरतुदींची पुरवणी मागणी मंजुर करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री, व वित्तमंत्री तसेच शालेय शिक्षण मंत्री यांना माहे डिसेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २८ ऑगस्ट २०१९ रोजी मंत्रिमंडळ बैठक क्र २३५ मध्ये तत्कालीन शासनाने सहाव्या वेतन आयोगानुसार ३०४ कोटी रुपये इतक्या खर्चाची तरतूद करण्यात येईल असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, घोषित, अघोषित, अंशतः अनुदानित सर्व शाळांना व तुकडयांना प्रचलित नियमानुसार 100 टक्के अनुदान मिळावे, विनाअनुदानित व अंशतः अनुदानित व सर्व शासनमान्य कर्मचारी पदांना सेवा संरक्षण मिळावे, अनुशेषाची अट शिथिल करुन मान्यताप्राप्त पदांना मंजुरी देऊन अनुदान उपलब्ध व्हावे, वैयक्तिक मान्यता न मिळालेल्या शिक्षक-शिक्षिकेत्तर पदांना मान्यता मिळावी आदि मागण्याप्रकरणी राज्यातील विनाअनुदानित, अनुदानित शाळा कृती समिती संघटनांनी मागणी करुनही अद्याप अनुदान वितरीत करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, काही शाळा व कनिष्ठ महाविद्यालये अघोषित राहिल्यामुळे विनाअनुदानित शाळांना अनुदान घोषित करण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र टिचर्स असोसिएशनने केली असून या मागण्यांसाठी दिनांक २३जानेवारी, २०२० पासून मुंबईच्या आझाद मैदान येथे महाराष्ट्र राज्य (कायम) विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा कृती समिती व अन्य शिक्षक संघटनांच्यावतीने उपोषण करण्यात येवून त्याबाबतचे निवेदन मा.शालेय शिक्षण मंत्री यांना देण्यात आल आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने या शाळा तुकड्या व अतिरिक्त शाखांवरील शिक्षक शिक्षकेत्तर पदांना सातव्या वेतन आयोगानुसार शासन मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-१२-२०२१) :** (१), (२), (३) (४) व (५)

मंत्रीमंडळाच्या दि.२८ ऑगस्ट, २०१९ च्या बैठकीत, अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना २० टक्के अनुदान मंजूर करणे व २० टक्के अनुदान सुरु असलेल्या प्राथमिक/ माध्यमिक शाळांना वाढीव २० टक्के अनुदान विहीत अटींच्या अधीन राहून मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने, याबाबतचा शासन निर्णय, दि.१३ सप्टेंबर, २०१९ निर्गमित करण्यात आला आहे.

तथापि, सदर शासन निर्णयातील अटी हया जाचक असल्याचे विविध संघटना व शिक्षक प्रतिनिधी यांनी निदर्शनास आणून, सदर अटी रद्द कराव्यात अशी विनंती शासनास केली होती. त्यास अनुसरुन, मा. मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली त्रुटी समिती गठित करण्यात आली होती. सदर त्रुटी समितीने सादर केलेला अहवाल पुढील मंत्रीमंडळ बैठकीत ठेवून, दि. १३ सप्टेंबर, २०१९ मधील शासन निर्णयातील काही अटी व शर्तीमध्ये, शासन निर्णय, दि. ४ डिसेंबर, २०२० अन्वये सुधारणा करण्यात आली.

त्यानुसार, पात्र शाळांच्या कागदपत्रांची शालेय शिक्षण विभागामार्फत तपासणी करण्यात येऊन, तपासणीत पात्र ठरलेल्या शाळांना दि.१२, १५ व दि. २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये नोव्हेंबर, २०२० पासून अनुदानास पात्र घोषित करुन निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तसेच, अघोषित शाळा अनुदानासाठी पात्र करण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालनालय स्तरावर तपासण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोयना जलविद्युत प्रकल्पग्रस्तांना महानिर्मितीच्या सेवेमध्ये सामावून घेण्याबाबत

**(२) १११६ (०२-०४-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपर मुख्य सचिव, ऊर्जा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत कोयना जलविद्युत प्रकल्पग्रस्तांना महानिर्मितीच्या सेवेमध्ये सामावून घेण्याबाबत अपर मुख्य सचिव, जलविद्युत यांनी दिनांक २० नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.प्रतापराव शिंदे, तालुका प्रमुख, चिपळूण यांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पग्रस्तांना सेवेत सामावून न घेतल्यास उपोषण केले जाईल असे कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी चौकशी करुन कोयना जलविद्युत प्रकल्पग्रस्तांना महानिर्मितीच्या सेवेमध्ये सामावून घेण्याबाबत तसेच विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-११-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. एईएम-१०८०//३५/१६-अ, दि.२१.०१.१९८० नुसार महानिर्मिती कंपनीकडून तंज्ञत्र-३ (वर्ग-३ पद) या पदाच्या सरळसेवा जाहिरातीवेळी प्रकल्पग्रस्तांसाठी, सर्वसाधारण (महानिर्मिती कंपनी बाहेरील उमेदवार) कोट्याअंतर्गत एकूण जाहिरात पदांच्या ५% पदे राखीव ठेवण्यात येतात. सदरील प्रकल्पग्रस्तांसाठीच्या ५% आरक्षित पदाअंतर्गत कोयना प्रकल्पग्रस्तांना स्पर्धा परीक्षामार्फत नोकरीची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

कोयना जलविद्युत केंद्रांतर्गत संपूर्ण जमीन जलसंपदा विभागाने संपादित केली असून मालकी हक्क जलसंपदा विभागाकडे आहे. सदरहू प्रकल्प दीर्घकालीन भाडे तत्वावर (Lease Basis) जलसंपदा विभागाने पूर्वाश्रमीचे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (एम.एस.ई.बी.) व सध्याच्या महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीकडे (महानिर्मिती) चालविण्यास दिला आहे. महानिर्मिती कंपनीने प्रत्यक्षपणे जमीन संपादित केलेली नसल्यामुळे सदरहू प्रकल्पाचा मालकी हक्क महानिर्मिती कंपनीकडे येत नाही. महानिर्मिती कंपनीचे पात्र प्रकल्पग्रस्त होण्याकरीता प्रकल्पग्रस्त उमेदवाराकडे महानिर्मिती कंपनीच्या नावाची कलम ४ (१) ची पेमेंट नोटीस व कलम १२ (२) ची नोटीस, प्रकल्पग्रस्त उमेदवाराच्या नावाची ॲवॉर्ड प्रत ही कागदपत्रे असणे आवश्यक आहे. जे प्रकल्पग्रस्त उमेदवार उपरोक्त कागदपत्रांची पूर्तता करतात, अशा प्रकल्पग्रस्त उमेदवारांना महानिर्मिती कंपनीचे पात्र प्रकल्पग्रस्त उमेदवार म्हणून महानिर्मिती कंपनीच्या सेवेमध्ये सामावून घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

———————————

### औरंगाबाद येथे अल्पसंख्याक कौशल्य विकास विद्यापीठ उभारण्याबाबत

**(३) ११७२ (०६-०४-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्याकासाठी कौशल्य विकास विद्यापीठ औरंगाबाद येथे स्थापन करण्याबाबत तसेच मुंबईतील भायखळा येथे उर्दु भवनासाठी ५० कोटी अनुदान मिळण्याबाबत शासनाने केंद्र शासनाकडे वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर प्रकरणी केंद्र शासनाकडून निधी मिळविण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२४-११-२०२१) :** (१) अशंत: खरे आहे. तत्कालीन मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांनी तत्कालीन केंद्रीय मंत्री (अल्पसंख्याक) यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक ५ एप्रिल २०१८ च्या अर्धशासकीय पत्रान्वये औरंगाबाद, महाराष्ट्र येथे अल्पसंख्याकासाठी कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्यास मंजूरी देण्याची व सदर उद्दिष्टासाठी रू. १०० कोटी इतके अनुदान मंजूर करण्याची मागणी केली होती. मात्र केंद्र शासनाकडून या प्रस्तावासंदर्भात कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. तथापि मुंबईतील भायखळा येथे उर्दू भवनासाठी ५० कोटी अनुदान मिळण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे कोणतीही मागणी केलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

------------

### मलेरिया, क्षय व इतर २१ औषधांच्या किंमतीमध्ये ५० टक्क्यांनी वाढ केल्याबाबत

**(४) १५४१ (०६-०४-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलेरिया, क्षय व इतर २१ औषधांच्या किंमतीमध्ये राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणाने (एनपीपीए) ५० टक्क्यांनी माहे डिसेंबर, २०१९ च्या सुमारास वाढ केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे गोरगरीब रुग्णांना याचा आर्थिक फटका बसणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या औषधांचे दरात योग्य ते बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (१७-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या रसायन आणि उर्वरीत मंत्रालय (औषध विभाग) च्या राष्ट्रीय औषध मुल्य निर्धारण प्राधिकरण (NPPA) यांनी त्यांच्या दिनांक १३ डिसेंबर, २०१९ च्या अधिसूचनेद्वारे यात नमूद २१ औषधांच्या किंमतीमध्ये वाढ केली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) औषधाचे दर निश्चीत करणे ही बाब केंद्र शासनाच्या रसायन आणि उर्वरीत मंत्रालय (औषध विभाग) च्या राष्ट्रीय औषध मुल्य निर्धारण प्राधिकरणाच्या (NPPA) कार्यकक्षेतील बाब आहे. त्यांनी दिलेल्या आदेशांचे अनुपालन करणे बंधनकारक आहे.

----------

## राज्यातील विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी बारावीच्या परिक्षेच्या कामकाजावर टाकलेला बहिष्कार

**(६) ३९५७ (०९-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी त्यांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी न लागल्याने राज्यातील विविध विभागीय परीक्षा मंडळावर मोर्चे काढून व बारावी परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकून आंदोलन केल्याचे दिनांक २३ जानेवारी २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंदोलनामुळे बारावीच्या परीक्षा कामकाजावर मोठा परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शिक्षकांचा वेतनाचा प्रश्न निकाली काढण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२२-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशंत: खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दि. १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित केले आहे. या शासन निर्णयातील काही अटी जाचक असल्यामुळे या अटी रद्द कराव्यात, अशी विनंती विविध संघटना व शिक्षक प्रतिनिधी यांनी शासनास केली होती. यानुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली त्रुटी समिती गठित करण्यात आली व या समितीने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, दि.१३ सप्टेंबर, २०१९ मधील काही अटी व शर्तीमध्ये शासन निर्णय दि.४ डिसेंबर, २०२० अन्वये सुधारणा करण्यात आली.

त्यानुसार, पात्र शाळांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येऊन, तपासणीत पात्र ठरलेल्या शाळांना दि.१२ फेब्रुवारी, २०२१ व दि.१५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये खाजगी प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित करुन, दि. १ नोव्हेंबर, २०२० पासून सरसकट २० टक्के / वाढीव २० टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यानुसार शासन निर्णय, दि.१७ मार्च, २०२१ अन्वये वेतन अनुदानासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तसेच, शासन निर्णय, दि. २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये २० टक्के अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आलेल्या मुंबई व कोल्हापूर विभागातील कनिष्ठ महाविद्यालयांना, शासन निर्णय, दि. १८ ऑगस्ट, २०२१ अन्वये वेतन अनुदानासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

___________

## पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, अंगणवाड्या व महाविद्यालये यांना सवलतीच्या दारात वीज उपलब्ध करून देण्याबाबत

**(७) ४५२१ (१६-०४-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, अंगणवाड्या व महाविद्यालये यांना सवलतीच्या दारात वीज उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी लोकप्रतीनिधिनी केली असल्याचे दिनांक १० जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शाळा महाविद्यालये यांचेकडून व्यावसायिक दराने वीजबिल वसूल केले जात असून त्याची प्रतिपूर्ती करण्यासाठी कोणताही निधी वा रक्कम तत्सम यंत्रणेकडून दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, अंगणवाड्या व महाविद्यालये यांना सवलतीच्या दारात वीज उपलब्ध करून देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२१-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे. महावितरण पुणे ग्रामीण मंडळांतर्गत अशा प्रकारचे मागणीचे पत्र लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाले आहे.
(२) हे खरे नाही. शाळा महाविद्यालय, अंगणवाडी व प्राथमिक केंद्रे यांना मा.आयोगाच्या वीज दर आदेशानुसार “सार्वजनिक सेवा” दराने वीज आकारणी करण्यात येत आहे. हे दर वाणिज्यिक वर्गवारीतील दरापेक्षा कमी आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

## लोणार व मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील अनेक गावातील विद्युत रोहित्रे जळाल्याबाबत

**(८) ४६९९ (१०-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार व मेहकर ( जि.बुलढाणा ) तालुक्यातील अनेक गावातील विद्युत रोहित्र जळाले असून संबधित अधिकारी यांच्याकडे तक्रार केली असता रोहित्रे बदलून न दिल्यास महावितरण कार्यालयास "ताला ठोको" चा इशारा राजकीय पक्षाच्या पदाधिकारी यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) तसेच चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-११-२०२१) :** (१) अशा आशयाची बातमी दैनिक लोकमत व दैनिक देशोन्नती या वृत्तपत्रांमध्ये दिनांक ०५.१२.२०१९ रोजी प्रकाशित झालेली होती.
(२) महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली असून अकोला परिमंडळ अतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव विभागाअंतर्गत लोणार उपविभागात एकूण १,१९६ रोहित्रे कार्यान्वित असून माहे एप्रिल, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत एकूण १७९ रोहित्र नादुरुस्त झाले होते. त्यापैकी एकूण १५८ रोहित्रे बदलण्यात आली असून माहे डिसेंबर, २०१९ अखेर रोहित्रे बदलणे बाकी होते. तसेच मेहकर उपविभागामध्ये एकूण १,४७९ रोहित्रे कार्यान्वित असून माहे एप्रिल, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत एकूण २३४ रोहित्रे नादुरुस्त झाली. त्यापैकी एकूण २०७ रोहित्रे बदलण्यात आले असून माहे डिसेंबर, २०१९ अखेर २७ रोहित्रे बदलणे बाकी होते.
लोणार उपविभागामधील नादुरुस्त असलेले २१ रोहित्रे व मेहकर उपविभागातील नादुरुस्त असलेले २७ रोहित्रे डिसेंबर, २०१९ चे अखेरीस व जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवडयात बदलून देण्यात आलेली आहेत. त्यामुळे कारवाई करण्यात आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**बीड जिल्हयात नवीन रेशनकार्ड धारकांना धान्य मिळत नसल्याबाबत**

**(९) ६२०७ (०७-०४-२०२०). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात सन २०१३ मध्ये नवीन तसेच जुन्या रेशनकार्डमध्ये १ किंवा २ नावे वाढविण्याात आलेल्या रेशनकार्ड धारकांना अद्यापपर्यंत स्वस्तधान्य दुकानातून धान्य मिळाले नसल्याची बाब फेब्रुवारी, २०२० च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नवनवीन नावे वाढविण्यात आलेल्या रेशनकार्ड धारकांना धान्य पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२४-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२ अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब योजना व एपीएल शेतकरी योजनेत तालुकानिहाय शिल्लक असलेल्या इंष्टाकानुसार पात्र लाभार्थ्यांकडून ऑनलाईन नोंदणीकरिता आवश्यक कागदपत्रे जमा करुन धान्य वाटप केले जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**जळगांव जिल्हयातील पाचोरा-१, पाचोरा-२, नगरदेवळा या महावितरण डिव्हीजन अंतर्गत शेतीपंपाकरिता वीज जोडणी मिळण्याबाबत**

**(१०) ६९५९ (०९-०४-२०२०). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील पाचोरा-१, पाचोरा-२ व नगरदेवळा या महावितरण डिव्हीजन अंतर्गत देण्यात येणाऱ्या कृषीपंप वीज जोडणी करिता पैसे भरुनही अद्याप विज जोडणी मिळाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. नितिन राऊत (२१-१०-२०२१) :** (१) पाचोरा-१, पाचोरा-२ , नगरदेवळा या उपविभागात उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे १५८ कृषीपंपांना व मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनाद्वारे ९३ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहेत. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहे.

(२) महावितरण मार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) ऊर्जा विभागाद्वारे दिनांक १८.१२.२०२० च्या शासन निर्णयानुसार दिनांक १.०४.२०१८ नंतर पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबतचे धोरण जाहीर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

## राज्यातील सर्व शाळा आदर्श शाळा करण्याबाबत

**(११) ११४१५ (१३-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाबळेवाडी (ता.शिरुर, जि.पुणे) येथील जिल्हापरिषदेच्या शाळेच्या धर्तीवर राज्यातील सर्व शाळा "आदर्श शाळा" करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, राज्यात सदरहू प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी किती निधीची आवश्यकता आहे,

(४) असल्यास, सदरहू प्रस्तावाच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही. मा. वित्त मंत्री यांच्या घोषणेनुसार राज्यात १५०० शाळा टप्प्या-टप्प्याने आदर्श करण्याचे नियोजन आहे.

(२), (३) व (४) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांपैकी प्रथम टप्प्यात ४८८ शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचा निर्णय दि.५/३/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर शाळा विकसित करण्यासाठी प्रथमत: शाळांच्या बांधकामासाठी रु. ४९४ कोटी इतकी तरतूद उपलब्ध करुन देणेबाबत मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला असून सदर तरतूद उक्त शाळांना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भायखळा (मुंबई) येथील कॉन्व्हेंट ऑफ जिजस मेरी स्पेशल स्कुल बंद केलाबाबत

**(१२) ११४४३ (१३-०९-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील कॉन्व्हेंट ऑफ जिजस मेरी स्पेशल शाळेच्या प्रशासनाने उक्त शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आयुक्त, दिव्यांग पुणे यांच्याकडून अहवाल मागविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने शाळा बंद न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०१-११-२०२१) :** (१) होय.

(२) व (३) आयुक्त, दिव्यांग कल्याण पुणे यांचा दि.२९.०७.२०२० रोजीचा अहवाल शासनास दि.१९.०८.२०२० रोजी प्राप्त झाला आहे. सदरहू प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चामोर्शी (जि.चंद्रपूर) तालुक्यात तंबाखुचा भेसळयुक्त कारखाना सुरु असल्याबाबत

**(१३) ११५८६ (१४-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चामोर्शी (जि.चंद्रपूर) तालुक्यात भेसळयुक्त तंबाखु निर्मितीचा कारखाना सुरु असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात तबांखुजन्य पदार्थाच्या विक्रीस प्रतिबंध असून चामोर्शी तालुक्यात प्रशासनाच्या संगनमताने भेसळयुक्त तबांखु निर्मिती होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय तबांखु नियंत्रण कार्यक्रम जिल्हा समन्वय अधिकाऱ्यांचे सदर प्रकरणी दुर्लक्ष होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०१-११-२०२१) :** (१) व २) हे खरे नाही.

(३) व (४) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता संचार बंदी लागू असल्याच्या काळात दि. ०१.०५.२०२० रोजी पो.स्टे.चार्मोशी मार्फत मुक्तीपथचे संचालक व जिल्हा समन्वय तथा सल्लागार राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम गडचिरोली यांनी खर्रा विक्री करणारे व घरात लपवून ठेवलेल्या तंबाखू विक्रेत्यांची शोध मोहिम राबविली असता चार्मोशी येथील इसमाच्या घरी सदर आदेशाचे उल्लंघन करून तंबाखू विक्रीसाठी बाळगल्याचे आढळून आले. सदर प्रकरणी एका इसमाविरुध्द पोलीस स्टेशन, चार्मोशी येथे अपराध क्रमांक २२६/२०२० कलम १८८, २६९, २७० भादंवि २, ३, ४ साथीचे रोग अधिनियक, सहकलम ५१-ब आपत्ती व्यवस्थापन अधिनियक-२००५, अन्वये गुन्हाचे दोषारोप पत्र क्र. ८३/२०२० दिनांक २४.०९.२०२० दाखल करण्यात आले आहे व सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------

### राज्यात मास्क, सॅनिटाझर व पीपीई किटसची जादा दराने विक्री होत असल्याबाबत

**(१४) ११६१९ (१४-०९-२०२०). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाच्या हाफकिन बायो फार्मास्युटिकल कार्पोरेशन या अंगीकृत उपक्रमांतर्गत दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी दर करार निश्चित केले असून कोरोनाच्या रुग्णाच्या संख्येत वेगाने वाढ होत असताना अतिआवश्यक यादीतून मास्क आणि सॅनिटायझर वगळल्यामुळे यांच्या किंमतीत वाढ झाल्याचे माहे जून, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक कंपन्या, पुरवठादार व दुकानदार मास्क, सॅनिटायझर व पीपीई किटसची

जादा दराने विक्री करुन नागरिकांची लूट करीत असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक ठिकाणी अवैध साठा व मास्क व सॅनिटायझर याचा जादा दराने विक्री केल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्याने कायदेशीर कारवाईचा इशारा अन्न आणि औषध विभागाचे सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर यांनी दिला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोरोना प्रतिबंधीत औषधांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवणे व त्याची जादा दराने विक्री करणाऱ्यांवर कारवाई करणे तसेच मा.आरोग्य मंत्री यांनी सांगितल्यानुसार मास्क व सॅनिटीझर वरील दर कमी करण्याबाबत अधिसूचना कधी काढण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मास्क, सॅनिटायझर व पीपीई किटसचा काळाबाजार होत असल्याच्या किती घटना निदर्शनास आल्या आहेत, त्यानुसार किती व्यक्तींवर कारवाई केली तसेच जप्त झालेल्या साहित्याची विल्हेवाट कुठे व कशी लावण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (१७-११-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. हाफकीन बायोफार्मास्युटीकल कॉर्पोरेशन या अंगीकृत उपक्रमांतर्गत दर करार करण्यात आलेले नाहीत. निविदा प्रक्रिया राबवून निविदेत प्राप्त झालेल्या दरानुसार पुरवठा आदेश निर्गमित करण्यात येतात.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) या संदर्भात शासनाने चौकशी केली असून जादा दराने विक्री करणाऱ्यांवर नियंत्रण राहण्यासाठी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग दि. २०.१०.२०२० अन्वये राज्यात मास्कचे दर निश्चित केले आहेत. कोरोना प्रतिबंधित औषधांच्या किंमतींवर National Pharmaceutical Pricing Authority (NPPA) या केंद्रशासनाच्या प्राधिकरणाकडून नियंत्रण ठेवले जाते.

शासन निर्णय दि.२०.१०.२०२० नुसार मास्कचे दर निश्चित केल्यानंतर सुमारे ३९३८ औषध विक्रेत्यांकडे तपासणी व पडताळणी करण्यात आली असता १६७ विक्रेत्यांनी जादा दराने मास्कची विक्री केली असल्याचे आढळून आले. सदर विक्रेत्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली असून पुढील कारवाई चालू आहे.

सॅनिटायझर बाबत औरंगाबाद विभागाने ०७ प्रकरणांत घाड टाकून सुमारे ७३ लाख ५७ हजार ३५६ रु. किंमतीचा साठा जप्त केला. सदर सात प्रकरणंत संबंधित पोलिस ठाणे येथे गुन्हे नोंदविले आहेत. तसेच बृहन्मुंबई विभागाने ०६ धाडी व पोलिसांसमवेत ०२ धाडी अशा एकूण ०८ धाडी टाकून सुमारे २७,७११,५४६ रु. किंमतीचा साठा जप्त करून तीन प्रकरणांत गुन्हे नोंदविले आहेत. सदर सर्व प्रकरणांत पुढील चौकशी व तपासकाम चालू आहे. अन्न व औषध प्रशासन,पुणे विभागाने ४ विना परवाना व १ बनावट सॅनिटायझर एकूण ०५ प्रकरणांत धाडी व जप्तीची कारवाई केली असून सुमारे २९,५५,४९८ रू. किंमतीचा साठा जप्त केला आहे. सदर प्रकरणांत ११ व्यक्तींना अटक करण्यात आलेली आहे.

पीपीई किटसंदर्भात काळ्याबाजाराची कोणतीही घटना निदर्शनास आलेली नाही.

सदर सर्व प्रकरणांत एकूण १६ व्यक्तींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच जप्त माल मा.न्यायालयाच्या परवानगीने संबंधित औषध निरीक्षक यांच्या ताब्यात ठेवण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

## बालचित्रवाणी संस्था (पुणे) बंद करण्याचा घेतलेला निर्णय रद्द करून संस्था पुनर्जीवित करण्याबाबत

**(१५) ११८४८ (१३-०९-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने शिक्षणासाठी उपग्रह या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था बालचित्रवाणी पुणे या संस्थेची सन १९८४ साली स्थापना करुन सन १९९२ मध्ये सार्वजनिक विश्वस्त संस्था या सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत नोंदणी करून संस्था स्वायत्त करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर बालचित्रवाणी संस्था स्वायत्त केल्यानंतर पहिले पाच वर्ष केंद्र शासनाने कार्यक्रम निर्मिती व वेतनासाठी शंभर टक्के अनुदान देण्याचे मान्य केले तर पाच वर्षानंतर संस्थेच्या वेतनाची जबाबदारी राज्यशासनाने घेण्याबाबत उच्च न्यायालयाने आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्थिक कारणास्तव राज्यशासनाने वेतनाची जबाबदारी न घेतल्यामुळे शालेय शिक्षण विभागाने दिनांक ३१ मे, २०१७ च्या शासन निर्णयानुसार बालचित्रवाणी संस्था बंद करण्याचा निर्णय घेवून सदर संस्थेतील कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्यात येऊन त्यांना कामावरून कमी करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बालचित्रवाणी संस्था ही सार्वजनिक विश्वस्त संस्था कायद्याअंतर्गत नोंदणी केलेले असतानाही ही न्यासाच्या नियामक मंडळाने संस्थेच्या घटना पत्रक व नियमावलीतील तरतुदीचा भंग करून संस्था बंद करण्याचा निर्णय दिनांक ३ एप्रिल, २०१७ रोजी नियामक मंडळाच्या झालेल्या बैठकीच्या आधारे घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीद्वारे उक्त बैठक झालीच नसून नियामक मंडळाचे बनावट बैठकीचे इतिवृत्त पाठवून उच्च स्तरावर ही संस्था बंद करण्याबाबत निर्णय घेण्यात आला असल्याने याबाबतची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत संस्थेच्या माजी कर्मचारी व लोकप्रतिनिधींनी तसेच नागरिकांनी लेखी पत्राद्वारे मा. मुख्यमंत्री, मा.मंत्री, शालेय शिक्षण व शिक्षण आयुक्त यांच्याकडे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच, बालचित्रवाणी संस्थेची डेक्कन जिमखाना परिसरातील पाच एकर जागा व दोनशे कोटी रुपयांचे मालमत्ता निर्मिती साहित्य बारा कोटी रुपयांच्या मोबदल्यात बालभारतीकडे बेकायदेशीरपणे हस्तांतरित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अशंत: खरे आहे.

सन १९९२ पर्यंत केंद्र शासनाने वेतनासाठी १००% अनुदान दिले होते. परंतु, मा.उच्च न्यायालय यांनी संस्थेच्या वेतनाची जबाबदारी राज्य शासनाने घेण्याबाबत आदेश दिले नव्हते.

(३) हे खरे आहे.

(४) दि.०३ एप्रिल, २०१७ रोजी नियामक मंडळाच्या झालेल्या बैठकीत वित्त विभाग व विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायांच्या आधारे यासंदर्भात निर्णय घेण्यात आला होता.

(५) अंशत: खरे आहे.

यासंदर्भात माहिती अधिकार कायद्यांतर्गत अर्ज प्राप्त झाले होते.

(६) हे खरे नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या नियमावलीत बंद उद्योग हस्तांतरणाबाबत नविन नियमावली तयार करण्याबाबत**

**(१६) १२०९१ (२०-०९-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, जळगाव, नागपुर, अमरावती, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांसह राज्यातील इतर औद्योगिक शहरात राज्य शासनाच्या उद्योग विभागाकडील सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत विविध आर्थिक फायदे घेतले परंतु गत काही वर्षांपासून उद्योग बंद अवस्थेत आहेत व भविष्यात पुन्हा कधीही सुरू होऊ शकणार असे एकूण ४५५०० उद्योग बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंद अवस्थेत असलेल्या उद्योगांमध्ये हजारो कोटी रुपयांची मालमत्ता धूळ खात पडून आहे व सर्व बंद उद्योगांकडे राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांचे कोट्यवधी रुपयांचे कर्ज वर्षानुवर्ष थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उद्योग विभागाकडील सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या नियमावलीतील प्रचलित तरतुदी नुसार कर्ज देणाऱ्या बँकांना असे बंद उद्योग नवीन उद्योजकास साधारणपणे पाच वर्षांचा कालावधी पूर्ण केल्याशिवाय हस्तांतरित करता येत नसल्याने जप्ती व विक्री करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बंद अवस्थेत असलेले उद्योग वर्षानुवर्षे त्याच जागेवर बंद असल्याने राज्यात नवीन उद्योग उभारणी करण्यासाठी उद्योजकास जमिनी उपलब्ध करुन देण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहे त्यामुळे हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची इच्छा उद्योजकांची असताना बंद उद्योगामुळे शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या नियमावलीत बंद उद्योग हस्तांतरणाच्या दृष्टीने उपाययोजना तथा नियमावलीत बदल करुन नवीन उद्योगास जागा उपलब्ध करुन महसूलात वाढ होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-१०-२०२१) :** (१) राज्यातील सामुहिक प्रोत्साहन योजना अंतर्गत १९९३ ते २०१३ अंतर्गत ३३९४ घटक त्यांचे कार्यकालावधीमध्ये बंद झाले आहेत.

(२), (३) व (४) बंद घटकामध्ये भांडवली गुंतवणूक रु.१५१५.९८ कोटी आहे. महाराष्ट्र औद्योगिक धोरण -२०१९ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या बंद उद्योग घटकांसाठी बंद उद्योग घटकांची जमिनीसकटची स्थिर मालमत्ता वापरात येणाऱ्या दृष्टीकोनातून अशा उद्योग घटकांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक १८ऑगस्ट, २०२१च्या शासन निर्णयानुसार विशेष अभय योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजनेचा कालावधी महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण -२०१९ च्या कालावधीपर्यंत (दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत राहील.)

महाराष्ट्र औद्योगिक धोरण -२०१९ जाहीर करण्यात आले असून, यामध्ये औद्योगिक समूह विकास, औद्योगिक जमिनीचा ६० टक्के औद्योगिक व ४० टक्के पूरक सेवा तसेच अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक सारखी प्रोत्साहने, मोठया भूखंडावर पुनर्विकास प्रकल्प राबविणे अशा प्रकारची प्रोत्साहने देऊन उद्योगांचे पुनर्वसन करण्यात येत आहे.

सामुहिक प्रोत्साहन योजनेनुसार पात्रता प्रमाणपत्र देण्यात आलेल्या घटकास एकूण पात्रता कालावधी व पाच वर्षाचा कार्यकालावधी या कालावधीत घटक चालू असणे आवश्यक आहे. काही कारणाने घटक कार्यकालावधीमध्ये बंद झाल्यास सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ च्या शासन निर्णयानुसार एकूण बंद कालावधीच्या काळात घटकाने उपभोगलेले आर्थिक अनुदान घटकाकडून वसूल केले जाते. शासनाची सर्व प्रकारची थकीत देणी वसुल झाल्यानंतरच सदर बंद घटकास ना-हरकत दाखला देण्यात येतो.

(५) महाराष्ट्र औद्योगिक धोरण -२०१९ च्या सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत शासन निर्णयातील Annexure-III च्या तरतूदीनुसार जर अस्तित्वातील घटकांनी यापूर्वी सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत अनुदानाचा लाभ घेतला असेल आणि घटक कार्यान्वयन कालावधीत बंद झाला व बँकेने सदर बंद घटकाची मालमत्ता ताब्यात घेऊन दुसऱ्या घटकास हस्तांतरीत केली असेल तर, त्या घटकास अतिरिक्त स्थिर मालमत्तेच्या गुंतवणूकीच्या प्रमाणात सामुहिक प्रोत्साहन योजनेचे फायदे अनुज्ञेय आहेत. (बंद उद्योग घटकातील स्थिर मालमत्तेमधील गुंतवणूक सामुहिक प्रोत्साहन योजनेच्या लाभास अनुज्ञेय असणार नाही). बंद घटकांकडून सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उपभोगलेली प्रोत्साहने वसुली संदर्भात दिनांक २५ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये कार्यपध्दती नियमित करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**केंद्र शासनाच्या “आरोग्य सेतू” अँप वरुन ऑनलाईन औषध विक्री केल्याबाबत**

**(१८) १२२३० (१४-०९-२०२०). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने कोरोना संबधित माहिती नागरिकांना प्राप्त व्हावी याकरिता “आरोग्य सेतू” अँप सुरु केले असून या अॅपच्या माध्यमातून ऑनलाईन औषध विक्री करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२० च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर बेकायदेशिर ऑनलाईन औषध विक्री थांबविण्यात यावी अशी मागणी परभणी जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०२-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

“द महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अॅन्ड ड्रगिस्ट्स असोशिएशन” कडून अशा प्रकारचे पत्र अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झाले होते.

(२) हे खरे आहे.

(३) जुलै २०२० पुर्वी aarogya setu app वरुन www.Aarogyasetumitr.in द्वारे ऑनलाईन औषध विक्रीसाठी लिंक होती. मात्र जुलै २०२० पासून aarogyasetumitr.in ची लिंक व इतर online औषध विक्री करणाऱ्या website साठी असलेली लिंकसुध्दा बंद करण्यात आली आहे. त्यामुळे जुलै २०२० पासून aarogya setu app वरुन ऑनलाईन औषधांच्या विक्रीसाठी कोणतीही लिंक अथवा सुविधा उपलब्ध नाही.

———————————

## कोरोना महामारीच्या काळात राज्यातील मुलांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये म्हणून ई-शिक्षणाच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(१९) १२३५३ (२८-०७-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाच्या वैश्विक महामारीच्या पार्श्वभुमीवर मुलांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये याकरता ई- शिक्षणाचा शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात राज्यातल्या ग्रामिण भागातील तसेच जिल्हा परिषदांच्या शाळामध्ये विद्यार्थ्यांसाठी डिजीटल टेक्नॉलॉजी उपलब्ध नसल्याचे तर शाळांतील ३७% पालकांकडे स्मार्टफोन असून त्यातील केवळ २० टक्के मुलांच्या पालकांच्या स्मार्टफोन ला इंटरनेट सुविधा उपलब्ध असल्याचे त्याचबरोबर राज्यभरात हे प्रमाण केवळ २७ टक्के असल्याचे एका सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिनेरिओ अमिडस्ट कोविड १९- ऑनग्राऊंड सिच्युएशन ॲण्ड पॉसिबल सोल्युशन या अभ्यास अहवालानुसार देशात ५६.१ टक्के मुलांकडे स्मार्टफोन नाही तर ३१.१. टक्के मुलांच्या घरी अजूनही टीव्ही नूसन राज्यातील विद्यार्थ्यांचाही यामध्ये समावेश असल्याने डिजिटल शिक्षणाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाला असून ऑनलाईन शिक्षणापासून ३५ ते ४० % विद्यार्थी उक्त सुविधा नसल्याने शिक्षणापासून वंचित राहणार आहेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, स्माइल फाऊंडेशन या उपक्रमाव्दारे दिल्ली, गुजरात, महाराष्ट्र यांसह २३ राज्यांत १६ एप्रिल ते २८ एप्रिल, दरम्यान प्राथमिक पातळीवर (इयत्ता पहिली ते पाचवी) १,९५७६ मुलांची, इयत्ता सहावी ते आठवी १२२७७, तर इयत्ता नववी व दहावीतील ५५३७ आणि उच्च माध्यमिकच्या ३२१६ मुलांची पाहणी करण्यात आली असून स्माइल फाऊंडेशनचे श्री.शंतनु मिश्रा यांच्या मते या पाहणीतून डिजिटल दरी स्पष्ट झाली असून ती कमी करणे मोठे आव्हान आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, शाळा सुरु करणे आणि ऑनलाईन शिक्षण याबाबत शिक्षण विभागाची स्पष्टता नसल्याने विद्यार्थ्याचे नुकसान होत असल्याने शाळा सुरु करण्याचा निर्णय शाळा व्यवस्थापन समितीवर सोपविणे हे चुकीचे असून ही पद्धत बंद करावी, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री यांनी म्हटले हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) संचालक यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार टीव्ही सुविधा उपलब्ध असणारे विद्यार्थी-५८.३८ % स्मार्टफोन सुविधा असणारे विद्यार्थी ३७.६५% आहेत.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे नाही.

या विभागाच्या दि.१०/११/२०२० व दि.१८/०१/२०२१ च्या शासन परिपत्रकान्वये इयत्ता ९ वी ते इयत्ता १२ वी व इयत्ता ५वी ते इयत्ता ८ वी च्या वर्गांसाठी शाळा सुरु करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**चंद्रपूर जिल्ह्यातील कर्ज सहकार विभागाच्या सर्वेक्षणानुसार शेतकरी कर्जापासून वंचित असल्याबाबत**

**(२०) १२६७८ (१७-०९-२०२०).:** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात २४ हजार ४९९ शेतकरी कर्ज योजनेसाठी पात्र असतांना केवळ ५ हजार ८०६ शेतकऱ्यांना खरीप २०२० च्या कर्ज वाटपाचा लाभ मिळाला असून १८ हजार ६९३ शेतकरी वंचित असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या बहुतांश सेवा सहकारी संस्थांच्या कर्जाचे परस्पर पुनर्गठन (रुपांतर) करण्यात आल्याने सुमारे १८ हजार ६९३ शेतकरी कर्जापासून वंचित राहिले असून, नागभीड (जि.चंद्रपुर) तालुक्यातील ५५१ शेतकऱ्यांचा महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेत आधार प्रमाणिकरण झाले नसणाऱ्या शेतकऱ्यांचा त्यात समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्जे मिळण्यास अडचणी येत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना पत्रव्यवहार केला असून, चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण करण्यासाठी दिनांक २३ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास सहकारी संस्थांना पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अद्यापही शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण न होणे, शेतकऱ्यांच्या सहमतीशिवाय परस्पर पुनर्गठन करणे, राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्जे मिळण्यास अडचणी येणे इत्यादीं विषयी दोषीं असलेल्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१२-११-२०२१) :** (१) व (२) चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सन २०२०-२१ खरीप हंगामाअखेर महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत ५२,०८० शेतकऱ्यांना रु.३०५.२७ कोटीचा लाभ देण्यात आला आहे. उपरोक्त कालावधीत चंद्रपूर जिल्ह्यामध्ये १,०४,१६४ शेतकऱ्यांना रु. ७५५.६४ कोटीचे कर्जवाटप करण्यात आले आहे.

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अंतर्गत असलेल्या सेवा सहकारी संस्था/ विविध कार्यकारी संस्थांच्या (एकूण ३९५ संस्था) सन २०१९-२० या कालावधीत १८,८७३ सभासदांचे कर्जाचे पुनर्गठन करण्यात आलेले असल्याने सदर १८,८७३ सभासदांचे पुनर्गठीत कर्जाचे हप्ते दिनांक ३०.०९.२०१९ अखेर थकीत नसल्याने सदर कर्ज प्रकरणे ही महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ या योजनेतील निकषांनुसार पात्र ठरलेले नाहीत.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सेलू तहसील कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(२१) १२७३९ (१३-०९-२०२०). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.वर्धा) तालुक्यातील तहसिल कार्यालय इमारतीच्या बांधकामाचे कार्यादेश दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी वा त्या सुमारास मे.विग्नहर्ता कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर सात वर्षाचा कालावधी झाला असतानाही तहसिल कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊ शकले नसल्याने तहसिल कार्यालय अजूनही सेलू येथील भाडेतत्वावर सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०१-१२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सद्य:स्थितीत इमारतीचे ८० टक्के काम पुर्ण झालेले आहे. उर्वरित काम डिसेंबर, २०२१ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाच्या अधिपत्याखालील महावितरण कंपनीमध्ये रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२२) १३४५३ (१३-०९-२०२०). डॉ.डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या आधिपत्याखालील महावितरण कंपनीमध्ये असलेल्या विविध रिक्त पदावर गेल्या अनेक वर्षांपासून हजारो विज कंत्राटी कामगार तुटपुंज्या वेतनावर काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ मध्ये समान वेतन कायदा मंजूर होऊनही महावितरण कंपनीच्या कामगारांना समान वेतन न देता किमान वेतन देऊन गेली वीस वर्षे शासन या कामगारांना राबवून घेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण कंपनीत ५००० विदयुत सहाय्यक व २००० तंत्र चालक अशी एकूण ७००० हजार पदांची नोकरभरती माननीय ऊर्जामंत्री यांनी दिनांक २३ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पंधरा ते वीस वर्ष कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना नोकरभरती मध्ये विशेष बाब म्हणून प्राधान्य मिळण्यासाठी तसेच त्यांच्या वयामध्ये सवलत देऊन त्याना अग्रक्रमाने रिक्त असलेल्या पदावर भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२९-११-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दि. २४.०७.२०१९ च्या अधिसूचनेद्वारे पुनर्निधारित केलेल्या दराने मुंबई दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील अनुसुचिकरीता किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील तरतुदीनुसार बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतन देण्यात येते. तसेच, किमान वेतन कायद्यान्वये कामगार आयुक्त कार्यालयाकडून अधिसूचनेद्वारे निर्देशित केलेला विशेष भत्ता, घरभाडे भत्ता व अर्जित रजेची रक्कम तसेच भविष्य निर्वाह निधी, कामगार राज्य विमा योजनेची वर्गणी, व्यवसाय कर इत्यादी देणी सदर कामगारांना अदा करण्यात येतात.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यामधील कंत्राटी कामगारांना संबंधीत कंपनीच्या सेवेत सामावून घेण्याबाबत कार्यकारी संचालक (मा.सं), महानिर्मिती कंपनी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या स्विकारण्यात आलेल्या शिफारशी ऊर्जा विभागाच्या दि. २०.०२.२०१९ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्या. व तिच्या तिन्ही उपकंपन्यांना नियमानुसार उचित कार्यवाहीकरीता कळविण्यात आल्या आहेत. त्यानुसार महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या कंपन्यांमध्ये सध्या कार्यरत तांत्रिक शिक्षण घेतलेल्या कामगारांना महावितरण, महानिर्मिती अथवा महापारेषण कंपन्यांच्या नियमित सेवेत सामावून घेण्याच्या प्रक्रियेच्या वेळेस, प्रत्येक वर्षासाठी २% आणि जास्तीत जास्त एकूण १० वर्षांच्या कालावधीत एकूण २०% अतिरिक्त गुण देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

———————————

## महावितरण कंपनीतर्फे कनिष्ठ अभियंता पदासाठी परीक्षेतुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत

**(२३) १३८८७ (२०-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीतर्फे सरळसेवा जाहीरात क्रमांक ०६/२०१९ अंतर्गत कनिष्ठ अभियंता पदासाठी परीक्षेतुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत लोकप्रतिनिधी बल्लारपूर यांनी ऊर्जा मंत्री यांना दिनांक ९ जुलै, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०६-१२-२०२१) :** (१) व (२) महावितरण कंपनीद्वारे पदविका अभियंता प्रशिक्षणार्थी पदांसाठी ३२७ जागांची जाहिरात क्र.६/२०१९ प्रकाशित करण्यात आली होती. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अधीन राहून सर्व प्रवर्गातील पात्र उमेदवारांना, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासप्रवर्ग (एस.ई.बी.सी) व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील (ई.डब्लू.एस) वगळून एकूण २२६ पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०५.०७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासप्रवर्ग (एस.ई.बी.सी) व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील (ई.डब्लू.एस) प्रवर्गातील उमेदवारांना विकल्प स्विकारुन सदर पदाची सुधारित निवड यादी तयार करुन भरती प्रक्रिया राबविण्याबाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील काही उमेदवारांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.५१९६/२०२१ दाखल केली आहे. सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

————————————

## राज्यात टोसिलीज़ुमाब (Tocilizumab) या कोरोना प्रतिबंधक औषधाची काळयाबाजारात विक्री होत असल्याबाबत

**(२४) १४००२ (१४-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात टोसिलीज़ुमाब (Tocilizumab) या कोरोना प्रतिबंधक औषधाचा तुटवडा असून त्याची काळयाबाजारात विक्री होत असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व तद्‌नुसार या औषधांचा काळाबाजार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (१७-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) अन्न व औषध प्रशासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे. राज्यात एकूण ०३ प्रकरणात Tocilizumab या औषधांचा काळा बाजार करून अवैधविक्री करणाऱ्या एकुण ०७ आरोपींना पोलिसांमार्फत अटक करण्यात आली असून प्रशासनातर्फे FIR नोंदविण्यात आले आहेत. पुढील तपासकाम चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

————————————

## केंद्र शासनाच्या व्यवसाय शिक्षण योजनेद्वारे राज्यातील शासकीय शाळांमध्ये कार्यरत असणाऱ्या व्यवसाय शिक्षकांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(२५) १४०६१ (१३-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या व्यवसाय शिक्षण योजनेद्वारे राज्यातील शासकीय शाळांमध्ये कार्यरत असणाऱ्या व्यवसाय शिक्षकांच्या समस्या सोडविण्याबाबत वि.स.स. बल्लारपूर यांनी मा.मंत्री शालेय शिक्षण यांना दिनांक १२ जुलै २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व्यवसाय शिक्षण या योजनेंतर्गत, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मार्फत खाजगी कंपन्यांव्दारे व्यवसाय शिक्षकांची नियुक्ती करण्यात येत असून त्यांच्या मागण्यांबाबत मा. मंत्री, महोदयांचे स्तरावर वेळोवेळी बैठका घेण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक शहरातील खाजगी शाळा पहिली व दुसरी इयत्तेतील विद्यार्थ्यांना दररोज ५-६ तास ऑनलाईन शिक्षण देत असल्याबाबत**

**(२६) १४६१७ (१३-०९-२०२०). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्याचा विचार करता त्यांना ऑनलाईन शिक्षण देवू नये असा निर्णय काढून व तसा आदेश असतानाही नाशिक शहरातील खाजगी शाळा पहिली व दुसरी इयत्तेतील विद्यार्थ्यांना दररोज ५-६ तास ऑनलाईन शिक्षण देत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सलग ५-६ तास ऑनलाईन शिक्षण घेवून डोळ्यांवर ताण पडून डोळ्यांच्या व्याधी व मायग्रेनसह अनेक शारीरिक व्याधींनी विद्यार्थी ग्रासले जाण्याची शक्यता असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालकांनी शिक्षणाधिकारी महानगरपालिका, नाशिक याच्याकडे तक्रार करूनही अद्यापपर्यंत सदरील खाजगी शाळेवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार सदरील खाजगी शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) शिक्षणाधिकारी, नाशिक, महानगरपालिका, नाशिक यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार खाजगी प्राथमिक शाळांना पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण बंद करणेबाबत आदेशित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील प्रत्येक तालुक्यात एक या प्रमाणे जिल्हा परिषदांच्या ३०० शाळा "आदर्श शाळा" (मॉडेल स्कुल) विकसीत करण्याबाबत

**(२७) १५५०२ (२७-११-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनेक मराठी शाळा बंद होण्याच्या मार्गावर असताना राज्यातील प्रत्येक तालुक्यात एक या प्रमाणे जिल्हा परिषदांच्या ३०० शाळा "आदर्श शाळा" (मॉडेल स्कुल) म्हणून विकसीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील अनुदानित शाळांमध्ये मराठी शाळांचे प्रमाण जास्त असून त्यांना पायाभूत सुविधा तसेच वेतनेत्तर अनुदान मिळत नसल्याने इतर शाळांप्रमाणे सुविधा देता येत नसल्याने विद्यार्थी संख्या घटत असून सदर मराठी शाळा बंद पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या आदर्श शाळांच्या यादीत जिल्हा परिषदेच्या शाळांसह मुंबईतील अनुदानित मराठी शाळांचाही समावेश करून सर्वच शाळा आदर्श शाळा बनविण्याकरिता शासनाने कोणती उपायोजना केली आहे वा करण्यात येणार आहे

(४) असल्यास, आदर्श शाळांसाठी निकष व शैक्षणिक गुणवत्तांचे स्वरुप काय राहणार आहे व आदर्श शाळा विकासीत करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी केंव्हा पासुन सुरु झाली आहे वा होणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) अशंत: खरे आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दि.०५ मार्च, २०२१ अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ४८८ शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबईतील अनुदानित शाळांना पायाभुत सुविधा देण्याची जबाबदारी संबंधित शाळा व्यवस्थापनाची असून सदर शाळांना नियमानुसार वेतनेत्तर अनुदान देण्यात येत आहे.

(३) व (४) मुंबईतील अनुदानित शाळांचा आदर्श शाळा योजनेत समावेश करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

## पारनेर (जि.अहमदनगर) तालुका सहकारी साखर कारखान्याच्या विक्रीत झालेला गैरव्यवहार

**(२८) १५७०१ (२६-११-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर (जि.अहमदनगर) तालुका सहकारी साखर कारखान्यावर राज्य सहकारी बँकेचे केवळ १९ कोटी ५० लाख रुपयांचे कर्ज असताना, सदर कारखाना राज्य सहकारी बँकेकडून विकण्यात आल्याची बाब दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य सहकारी बँकेच्या गैरव्यवहारा प्रकरणी ७६ संचालकांवर आर्थिक गैरव्यवहाराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या गुन्ह्याच्या तपासासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पथकाने सखोल चौकशी केली असता राज्य सहकारी बँकेने विक्री केलेल्या मालमत्तेच्या व्यवहाराबाबत सुमारे ३०० पानांचा चौकशी अहवाल सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालानुसार अद्ययावत यंत्रसामुग्री व मोठी स्थावर मालमत्ता असणाऱ्या पारनेर तालुका, सहकारी साखर कारखान्याची विक्री करण्याची आवश्यकता नसताना कारखाना विकण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-११-२०२१) :** (१) नाही.

(२), (३), (४) सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानुषंगाने आर्थिक गुन्हे विभागामध्ये गुन्ह्याची नोंदही करण्यात आली आहे. मात्र राज्य सहकारी बँकेने त्यांच्या दिनांक ०१.१२.२०२० च्या पत्राने गुन्हे शाखेमार्फत करण्यात आलेल्या चौकशी बाबतचा अहवाल सत्र न्यायालयात दाखल केला असून सदर प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झाला नसल्याचे स्पष्ट केले आहे. कारखान्याच्या मालमत्ता विक्री व्यवहाराची चौकशी सहकार आयुक्तामार्फत करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या "स्टार्स" योजनेबाबत

**(२९) १६००६ (२६-११-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अमंलबजावणीसाठी राज्यातील सर्व विभागातील शिक्षणतज्ञांचा व अभ्यासकांचा समावेश असलेली समिती नेमण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २१ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय, असल्यास, अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे व यानुसार केंद्रीय शिक्षण धोरणात कोणत्या सुधारणा प्रस्तावित आहेत,
(३) असल्यास, या नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या "स्टार्स" योजना राज्यात जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे, सदर योजनेची अंमलबजावणी केव्हा करण्यात येणार आहे व यासाठी जागतिक बँकेकडून किती आर्थिक सहाय्य मिळणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) समितीची कार्यवाही सुरु आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने देशातील इतर पाच राज्यांसह महाराष्ट्र राज्याची सदर प्रकल्प राबविण्यासाठी निवड केली आहे. सदर प्रकल्पांतर्गत उद्दिष्टे व नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची उद्दिष्टे यांच्यात साम्य आहे.
(४) सदर प्रकल्प राज्यात राबविणेबाबत दि.११ फेब्रुवारी, २०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत खालीलप्रमाणे पाच घटक आहेत.

- पूर्व प्राथमिक (Early childhood) शिक्षणाचे सशक्तीकरण.
- अध्ययन मुल्यांकन (assessment/tests) पध्दतीत सुधारणा करणे
- शिक्षकांना online व blended प्रशिक्षणाव्दारे विकास करणे व प्रशिक्षणावर प्रभावी संनियंत्रणासाठी स्वतंत्र Teacher Training platform विकसित करणे.
- शाळा ते काम/शाळा ते उच्च शिक्षण हे संक्रमण सुलभ करणे.
- प्रभावी प्रशासन व विकेंद्रीत व्यवस्थापन करणे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माजी संचालक महावितरण, मुंबई यांनी केलेला अपहार व वित्तीय अनियमितता

**(३०) १७४७२ (१३-११-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण, मुंबईचे निवृत्त संचालक यांनी स्वतःच्या मुलाच्या वेस्ट ग्रीन्ड सोल्युशन व उर्जा इंफ्राटेक अँड पावर प्रोजेक्ट प्रा.लि या कंपनीला बाह्य कामे देऊन अनियमितता करून शासनाच्या करोडो रूपयाची अफरातफर, वित्तीय अनियमितता व गैरव्यवहाराची अनेक प्रकरणे दिनांक १० सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी श्री.डी.व्ही.शेळके यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक १५ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अनियमितते बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-११-२०२१) :** (१), (२) व (३) महावितरण कंपनीचे सेवानिवृत्त संचालक यांच्या विरूध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी आदेश दिले असून त्या अनुषंगाने महावितरण कंपनीने चौकशी सुरू केली आहे. सदर चौकशी अहवाल अद्यापि अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

————————————

**कोरोनाच्या पाश्वभूमीवर तलासरी (जि.पालघर) आश्रमशाळाच्या मुलांच्या परीक्षा घेण्याचे आदेश डहाणू प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिल्याबाबत**

**(३१) २०३१४ (१५-०१-२०२१). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाच्या पाश्वभूमीवर शाळा, कॉलेज बंद असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी मुलांच्या घरी जाऊन त्यांचा अभ्यास घ्यावा तसेच कोणत्याही प्रकारच्या परीक्षा घेऊ नयेत, असे शासनाचे स्पष्ट आदेश असताना, देखील तलासरी तालुक्यातील (जि.पालघर) आश्रमशाळाच्या मुलांच्या परीक्षा घेण्याचे आदेश डहाणू प्रकल्प अधिकारी यांनी दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तलासरी आदिवासी गावात राहण्याऱ्या मुलांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने बहुतांश मुलांकडे स्मार्ट फोन उपलब्ध नाहीत, तसेच डोंगराळ भाग असल्याने नेटवर्कची समस्या असल्याने ऑनलाईन अभ्यास घेणे कठीण होत असून मुलांना पुस्तकेही दिली नसल्याने मुलाना कसे शिकवावे तसेच त्याच्या परिक्षा कशा घ्यावा याबाबत शिक्षकांमध्ये सभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, आश्रमशाळांच्या शिक्षकांना दररोज शाळांमध्ये सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ०५.०० वा. येऊन नंतर गाव पाड्यात जाऊन तेथून लोकेशन दाखवणे सक्तीचे केले असल्याणे शिक्षकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन तलासरी गावातील मुलाना शिक्षण मिळण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१४-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) विद्यार्थ्यांना घरपोच पुस्तके देण्यात आली आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) कोरोनाच्या पार्श्वभुमीवर शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी आश्रमशाळांमध्ये अनलॉक लर्निंग उपक्रम राबविण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

————————————

**मौजे जसवली (ता. श्रीवर्धन, जि. रायगड) येथील गट क्र. ५३० व ५३२ मध्ये अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(३२) २७१८२ (२७-०५-२०२१). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जसवली (ता. श्रीवर्धन, जि. रायगड) येथील गट क्र. ५३० व ५३२ मध्ये अनधिकृत बांधकाम केल्या प्रकरणी दिनांक ११ मार्च २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, रायगड व उप विभागीय अधिकारी, श्रीवर्धन यांना निवेदने देऊन सबंधित विकासकावर गुन्हे दाखल करुन दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामपंचायतीकडून गट क्र. ५३० व ५३२ मध्ये तळ अधिक दोन मजल्याच्या चार इमारती व ९ बंगले यांचे बांधकाम करण्याचा ना हरकत दाखला विकासकाने घेतला असता जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिलेल्या परवानगी मध्ये ७ इमारती बांधकाम करण्याचा उल्लेख असल्यामुळे यात तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे बांधकाम जसवली बागमांडला रस्त्याच्या प्र.रा.मा.क्र. ४ लागत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या परवानगी मध्ये रस्त्याच्या मध्यापासून ४० मीटर अंतरापलीकडे बांधकामास परवानगी दिली असताना रस्त्याच्या मध्यापासून ४० मीटर अंतराअलीकडेच बांधकाम केले असल्याचे निदर्शन आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अनधिकृत बांधकाम प्रकरणी अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, जिल्हाधिकारी, रायगड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते यांनी दिनांक ६ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन एमआरटीपी कायद्या अंतर्गत विकासकावर कारवाई करून गट विकास अधिकारी पंचायत समिती, श्रीवर्धन यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०१-१२-२०२१) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्री.मंगेश वसंत हेदुळकर यांनी मौजे जसवली, ता.श्रीवर्धन येथील गट नं.५३० व ५३२ मध्ये अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी दाखल केलेली तक्रार मागे घेतली आहे.

मौजे जसवली, ता.श्रीवर्धन येथील गट नं.५३० व ५३२ क्षेत्र १-०३.३ हे.आर या जमिनीवर श्री.सादिक अ गफूर सरखोत व इतर ३ यांना एकूण ७ इमारत करिता निवासी प्रयोजनासाठी जिल्हाधिकारी, रायगड यांचे दिनांक १४.०८.२०१५ च्या आदेशान्वये बिनशेती परवानगी देण्यात आली आहे.

सदर इमारतीचे बांधकाम रस्त्याच्या मध्यापासून १९ मी.अंतरावर केले असल्याने पथकिनारवर्ती नियमाचा भंग झाला असून संबंधितांनी बिनशेती आदेशातील अटी व शर्तीचा भंग केल्याचे दिसून आले आहे. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांना ४०.०० मी. च्या आतील अनधिकृत बांधकाम निष्कासित करणेबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांनी कळविले आहे.

———————————

### धायरी (ता.हवेली, जि.पुणे) येथे अवैधरीत्या मुरूम व गौण खनिजांचे उत्खनन केल्याबाबत

**(३३) २७२४१ (०९-०६-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धायरी (ता.हवेली, जि.पुणे) येथील स.नं.१८/२, मॅजेस्टीक मृगवर्षा बांधकाम प्रकल्पा दरम्यान बांधकाम व्यावसायिकांनी अवैधरीत्या मुरुम व गौण खनिजांचे उत्खनन केले असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृतपणे माती व मुरुमाच्या खोदाईसह वाहतूक केल्याप्रकरणी संबंधितांवर कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यात आली नसून त्या जागी बांधकाम होऊन इमारती उभ्या राहिल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने अवैधरीत्या मुरुम व गौण खनिजांचे उत्खनन करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०१-१२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) मौजे धायरी, ता. हवेली, जि. पुणे येथील स. नं. १८/२ अशा स्वरुपाचा गा. न. नं. ७/१२ गावच्या अभिलेखामध्ये आढळून आला नाही. तथापि, स. नं.११८/२ व ११७/१ येथे मॅजेस्टीक हेरीटेज लि. या कंपनीने १६२० ब्रास गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याने संबंधिताविरुध्द तहसिलदार, हवेली यांनी दि.०७/०७/२०२१ रोजीच्या आदेशान्वये रु.६८,८९,२४०/- एवढ्या दंडात्मक रकमेचे आदेश पारीत केले आहेत. दंड वसुलीची कार्यवाही तहसिलदार, हवेली यांचेमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३४) २९५२६ (११-०६-२०२१). श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये व विद्यापीठे यामध्ये सुमारे १५ हजारांपेक्षा अधिक सहाय्यक प्राध्यापकांची पदे गत सहा वर्षांपासून रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) अधिसूचनेनुसार दिनांक १ जुलै, २०२१ रोजीपासून विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक पदाकरीता नेट, सेट तसेच पीएचडी सुद्धा अनिर्वाय करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठात ५० टक्के सहाय्यक प्राध्यापकांची पदे रिक्त असताना नेट, सेट तसेच पीएचडी सुद्धा अनिर्वाय करण्यात येणे तसेच पदभरतीला मान्यता मिळत नसल्याने यासंबंधी विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) राज्य शासनाला वारंवार सहायक प्राध्यापकाची पदे भरण्याच्या सूचना करुनही शासनाकडून आर्थिक परिस्थितीचे कारण देऊन पदे भरण्याचे टाळले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जानेवारी, २०२१ ला -उच्च शिक्षण विभाग आपल्या दारी॰ या उपक्रमादरम्यान मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी राज्यातील सर्वच विद्यापीठांचा दौरा करुन प्राध्यापक भरती सरु करण्याचे आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

दिनांक १/१०/२०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या ११७१ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांत सहाय्यक प्राध्यापकांच्या अनुज्ञेय ३११८५ पदांपैकी २२२३६ पदे भरलेली असून ८९४९ पदे रिक्त आहेत.

तसेच माहे मार्च २०२०-२१ अखेर १२ अकृषी व ३ अभिमत विद्यपीठे अशा एकंदरीत १५ विद्यापीठांमध्ये एकूण २६०० शिक्षकीय पदे मंजूर असून १३२९ पदे भरलेली आहेत व १२७१ पदे रिक्त आहेत.

(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे अंशत: खरे आहे.
(५) व (६) राज्यातील अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील मोठया प्रमाणावर रिक्त असलेल्या शिक्षक / शिक्षकेत्तर पदांपैकी सहाय्यक प्राध्यापकांची ४० % म्हणजेच ३५८० पदे भरण्यास उच्चस्तरिय समितीने मान्यता दिलेली आहे. यानुसार दिनांक ०३/११/२०१८ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, त्यानुसार पदभरतीची प्रक्रिया सुरू होती. परंतु कोविड १९ च्या संसर्गजन्य रोगामुळे उदभवलेल्या परिस्थितीत वित्त विभागाच्या दिनांक ४/५/२०२० च्या आदेशान्वये निर्बंध जारी करण्यात आल्याने सद्य:स्थितीत वरील भरतीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती.

यासंदर्भात वित्त विभागाच्या सहमतीने दिनांक ४/५/२०२० पूर्वी पदभरतीची जाहिरात प्रसिध्द केलेल्या चार विद्यापीठांच्या बाबतीत शासनाच्या दिनांक १४/७/२०२० च्या पत्रान्वये एक खास बाब म्हणून पदभरती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच अनुदानित महाविद्यालयांत रिक्त असलेल्या पदांच्या बाबतीत सदरची पदे न भरल्यास होणारा परिणाम लक्षात घेता, उक्त खंडीत झालेली भरती प्रक्रिया शासनाच्या दिनांक १२/११/२०२१ च्या आदेशान्वये सुरू करण्यात आलेली आहे.

———————————

### राज्यात म्युकरमायकोसिस औषधीचा तुटवडा व होत असलेला काळाबाजार

**(३५) २९८२४ (११-०६-२०२१). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान म्युकरमायकोसिस औषधांचा तुटवडा होत असल्याचे तसेच या औषधांचा मोठया प्रमाणात काळाबाजारही सुरु असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, म्युकरमायकोसिस वरील औषधांचा योग्य प्रमाणात पुरवठा करुन त्याचा होत असलेला काळाबाजार रोखण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) तसेच काळाबाजार करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०१-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मे, २०२१ पासून म्युकरमायकोसिस च्या उपचारासाठी लागणारे औषध Amphotericin-B Injection, या औषधाचा तुटवडा जाणवत होता. परंतु या औषधांची काळाबाजार सुरु असल्याची बाब अन्न व औषध प्रशासनास निदर्शनास आलेली नाही.

(२) Amphotericin-B Injection चे Allocation केंद्र शासनाकडून होत आहे. सदर औषधाचा काळाबाजार होऊ नये म्हणून सदर औषधाचा संपूर्ण साठा, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका खरेदी आदेशाद्वारे खरेदी करते व इतर महाराष्ट्रासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग सदर औषधांची खरेदी करून सरकारी आणि खाजगी रुग्णालयांना जिल्हानिहाय रुग्णसंख्या विचारात घेऊन वितरण करण्यात येते.

औषधांचा पुरवठा वाढल्यानंतर दि. १३.०६.२०२१ पासून सदर औषधांचे विक्री/वितरण खाजगी पुरवठादारामार्फत करण्यास अनूमती देण्यात आली. सदर विक्री/वितरण हे रुग्ण संख्येच्या प्रमाणात होत असून जिल्ह्याअंतर्गत वितरण मा.जिल्हाधिकारी व अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली होत आहे.

(३) म्युकरमायकोसिसच्या औषधाची अवैधरीत्या विक्री होत असल्याची एक बाब पुणे येथे निदर्शनास आली. या प्रकरणी पोलीसांच्या मदतीने कारवाई करून वाकड पोलीस स्टेशन, पुणे येथे दि. ०७.०६.२०२१ रोजी FIR दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिसांमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वसमत (जि.हिंगोली) शहरालगत असलेल्या कौठा रोडवरील विटभट्टीत काम करीत असतांना विदयुत तार पडुन दोन कामगारांचा झालेला मृत्यु

**(३६) ३०४४४ (१५-०६-२०२१). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिंगोली) शहरालगत असलेल्या कौठा रोडवरील विटभट्टीत काम करीत असतांना विदयुत तार पडून दिनांक ०६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास विदयुत तार पडून २ कामगारांचा जागीच मृत्यू जाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागातील अनेक विदयुत तारा जीर्ण व जोडलेल्या असल्याने त्या बदलण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी करूनही त्याकडे महावितरण अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे ही दुर्घटना घडली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने जीर्ण झालेल्या विदयुत वाहिन्या बदलण्याबाबत तसेच उक्त कामगारांच्या मृत्युस जबाबदार असणाऱ्या संबधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मृत पावलेल्या कामगारांच्या कुटुंबाला महावितरण याच्याकडून आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

दिनांक ०६.०३.२०१२१ रोजी कौठा रोडवरील विटभट्टीत काम करणाऱ्या दोन मजूरांच्या अंगावर ११ के.व्ही. विद्युत वाहिनीची तुटलेली तार पडून मृत्यू झाल्याची घटना घडली होती.
(२) हे खरे नाही.

सदर मौजे कौठा रोड येथे वीटभट्टी कारखाना आहे. या परिसरामधून ११ के.व्ही. विद्युत वाहिनी गेलेली आहे. दिनांक ०६.०३.२०२१ रोजी सकाळी अंदाजे ८ वाजताच्या सुमारास अचानक वादळी वारा सुटल्यामुळे वरुन जाणाऱ्या ११ के.व्ही. विद्युत वाहिनीची एक तार मागील पोलवरील पीन इन्सुलेटर पासून काही अंतरावरुन तुटून विद्युत वाहिनी खाली काम करणाऱ्या मजुराच्या अंगावर पडल्याने विद्युत धक्क्याने दोघांचा घटनास्थळी मृत्यू झाला. सदर घटना ही नैसर्गिक आपत्तीमुळे घडली आहे.
(३) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षण विभाग, हिंगोली यांनी केलेल्या चौकशीवरुन सदर अपघातास वीज वितरण कंपनीस जबाबदार धरण्यात आले आहे व अपघातग्रस्तांच्या कायदेशीर वारसास प्रचलित नियमानुसार नुकसान भरपाई देण्याची शिफारस केली आहे.
(४) मृत व्यक्तीच्या वारसास प्रत्येकी रु.२०, ०००/- प्रमाणे तातडीची आर्थिक मदत देण्यात आलेली असून इतर आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यावर दि.१८.०६.२०२१ रोजी देय असलेली उर्वरित रक्कम प्रत्येकी रु.३,८०,०००/- इतकी रक्कम वारसांना अदा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

___________

## पेठ रोड (ता.जि. नाशिक) येथे आदिवासी विकासमंडळा तर्फे मुलींच्या बहुमजली वसतीगृहाचे बांधकाम करण्यासाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रिया झालेला गैरव्यवहार

**(३७) ३०६६९ (१५-०६-२०२१). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड-१९ कोरोना संसर्गजन्य साथीच्या आजारामुळे संपूर्ण देशात व राज्यात लॉकडाऊन असताना मार्च २०२० ते जून २०२० या कालावधीत सर्व खाजगी व शासकीय आस्थापना बंद असतानाही पेठ रोड (ता.जि.नाशिक) येथे आदिवासी विकासमंडळा तर्फे मुलींच्या बहुमजली वसतीगृहाचे बांधकाम करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निविदा प्रक्रियेत विशिष्ट कंत्राटदाराना फायदा होण्याच्या दुष्टने शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३ दि. ४ मे २०२० मधील बाब क्र.१३ चे उल्लंघन करण्यात आले असल्याने सदरील निविदा प्रक्रिया नव्याने राबविण्याबाबत मा.लोकप्रतिनिधीनी यांनी दिनांक ४ जुन, २०२० रोजी वा त्यासुमारास आदिवासी मंत्री यांना निवेदनाव्दारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन, आदिवासी विभाग मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ०८/०६/२०२० च्या पत्र क्र.आवग्रु १३१९/प्र.क्र.७५/का.०५ व्दारे अधीक्षक अभियंता सा.बा (आदिवासी) मंडळ नाशिक यांना सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अधीक्षक अभियंता सा.बा (आदिवासी) मंडळ नाशिक यांनी विशिष्ट कंत्राटदाराला थेट फायदा पोहचविण्यासाठी शासनाची दिशाभूल करणारा अहवाल दिनांक १६ जुन, २०२० रोजी वा त्यासुमारास सादर केला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्याअनुषंगाने निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत तसेच संबधित दोषीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०२-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

निविदा सूचना दि. ३१/०१/२०२० रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा विक्रीसाठी दि. २८/०२/२०२० पासून उपलब्ध होत्या. त्यानुसार निविदा महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली. निविदा जाहिरात व निविदा विक्री उपलब्धी या दोन्ही बाबी लॉकडाऊन सुरु होण्यापूर्वी पार पडलेल्या आहेत. तसेच, निविदा कालावधी दि. ०३/०३/२०२० ते २७/०३/२०२० या दरम्यान होता.
(२) व (३) हे खरे आहे.

प्रस्तुत वसतिगृह इमारत बांधकामाची निविदा प्रक्रिया नव्याने राबविण्याबाबत मा. लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०४/०६/२०२० रोजीच्या निवेदनाव्दारे मागणी केली आहे. त्यानुषंगाने दिनांक ०८/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नाशिक यांच्याकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.
(४) हे खरे नाही.

अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नाशिक यांनी वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**राज्यात विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याबाबत**

**(३८) ३०८५६ (१८-०६-२०२१). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात उच्च शिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून विद्यापीठ, महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत म्हणून राज्य शासनाच्या विविध १४ शिष्यवृत्ती योजना कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या विविध १४ शिष्यवृत्ती योजना अस्तित्वात असतानाही सन २०१८-१९, २०१९-२० आणि २०२०-२१ या ३ वर्षात सदर योजनेंतर्गत अंदाजे ६ लाख ७५ हजार ३५८ विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले असताना केवळ ४ लाख २८ हजार २७५ विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती मिळाली असून ३५ टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे माहितीच्या अधिकारातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवणाऱ्यांवर कारवाई करुन उर्वरित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०६-१२-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) राज्य शासनाच्या विविधी १४ शिष्यवृत्ती योजनांतर्गत महाडीबीटी पोर्टलवर सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या ३ वर्षात एकुण प्राप्त अर्जांची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| (१) शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जांची संख्या | ६,८५,०३० |
| (२) विद्यार्थ्यांनी स्वत:हून रद्द केलेल्या अर्जांची संख्या | ८६,६४९ |
| (३) त्रूटीपुर्ततेसाठी विद्यार्थ्यांना परत पाठविलेल्या अर्जांची संख्या | १६,६८९ |
| (४) शिष्यवृत्ती नामंजूर करण्यात आलेल्या अर्जांची संख्या | ४६,१३१ |
| (५) सद्यस्थिती कार्यवाही सुरु असलेल्या अर्जांची संख्या | २,८४० |
| (६) शिष्यवृत्ती मंजुर करण्यात आलेल्या अर्जांची संख्या | ५,०२,४३७ |

एकुण प्राप्त अर्जापैकी ५,०२,४३७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली असून हे प्रमाण ७३ % इतके आहे. तसेच प्राप्त अर्जापैंकी ८६,६४९ अर्ज विद्यार्थ्यांनी स्वत:हून रद्द केले असून हे प्रमाणे १२.६% आहे.

सन २०१९-२० मधील ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज शिष्यवृत्तीच्या त्रुटीपुर्ततेसाठी परत पाठविले आहेत त्यांना अर्ज फेरसादर करण्याकरीता दिनांक १५/९/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच सन २०२०-२१ मध्ये शिष्यवृत्ती करता अद्यापही अर्ज सादर न केलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज सादर करण्यास दिनांक ३०/९/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्रुटीपुर्ततेसाठी परत पाठविलेल्या अर्जाची संख्या ही २,८४० इतकी असून हे प्रमाण २.५% आहे.

शिष्यवृत्ती नामंजूर करण्यात आलेल्या अर्जाच्याबाबत आवश्यक शैक्षणिक अर्हता नसणे, शिष्यवृत्ती नुतनीकरणाकरीता मागील वर्षी आवश्यक उपस्थिती तसेच गुणांची टक्केवारी नसणे अशा कारणांमुळे शिष्यवृत्ती नामंजूर करण्यात आली आहे. प्राप्त अर्जापैकी ४६,१३१ अर्जांची शिष्यवृत्ती नामंजूर करण्यात आली असून हे प्रमाणे फक्त ६.८%आहे. अशा प्रकारे कोणत्याही पात्र उमेदवारास शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

## राज्यात नवोदय विद्यालये सुरु करण्याबाबत

**(३९) ३२२२४ (११-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण व शहरी भागातील हुशार विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या नवोदय विद्यालयाचा अनेक गरीब विद्यार्थ्यांना फायदा झाला असून सद्य:स्थितीत वाढती लोकसंख्या व विद्यार्थ्यांची गरज पाहता अशी विद्यालये प्रत्येक जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी सुरु करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, याबाबत सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महानिर्मिती आणि एनटिपीसी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून २५०० मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबत

**(४०) ३२२४५ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महानिर्मिती आणि एनटिपीसी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून २५०० मेगावॅटचा प्रकल्प राबवला जाणार असल्याची घोषणा ऊर्जामंत्री यांनी दिनांक १८ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे स्वरूप काय असून प्रकल्प कोणत्या ठिकाणी राबविला जाणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या उभारणीच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (३०-११-२०२१) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या अल्ट्रा मेगा नवीकरणीय ऊर्जा पार्क योजनेच्या पर्याय क्रमांक ८ च्या माध्यमातून महानिर्मिती कंपनीव्दारा नॅशनल थर्मल पॉवर कार्पोरेशन समवेत संयुक्त उद्यम कंपनीच्या माध्यमातून राज्यात २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. या अनुषंगाने महानिर्मिती व एनटीपीसी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत लागणाऱ्या जागेसाठी स्वारस्य अभिव्यक्ती प्रसिध्द केली असून, या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन अंतिमत: जमीन निश्चित करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मोहदरी (ता. चिखली, जि. बुलढाणा) येथील भूसंपादन प्रकरण क्र २२ /२००८ -२००९ अन्वये फळझाडांचे मूल्यांकनानुसार मोबदला मिळणेबाबत**

**(४१) ३२२५० (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोहदरी (ता. चिखली, जि. बुलढाणा) येथील श्री रवींद्र भीमराव कुलसुंदर यांच्या फळझाडांचे मूल्यांकन भूसंपादन प्रकरण क्र २२ /२००८ -२००९ अन्वये झालेले असूनही चुकीने प्रपत्र ई मध्ये फळझाडांची किंमत शून्य दर्शविण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मूल्यांकनाप्रमाणे मोबदला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे अन्यायग्रस्तांच्या मागणीचे निवेदन दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०२-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

भूसंपादन प्रकरण क्र.२२/२००८-०९ मौजे मोहदरी तालुका चिखली जि.बुलढाणा या मध्ये भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ११ खाली दि.३०/४/२०१३ रोजी निवाडा घोषित करण्यात आला होता. या निवाडयामध्ये परिच्छेद-१५ मध्ये जमिन व फळझाडांच्या मूल्यांकना संदर्भात श्री.रविंद भीमराव कुलसुंदर त्यांचे गट नं.७६ मधील संपादीत ०.८० हेक्टर आर या क्षेत्रातील फळझाडांच्या मूल्यांकनाची रक्कम रु.१,४७,३११/- व जमीनीच्या मूल्यांकनाची रक्कम रु.१,५२,०००/- या पैकी जी अधिक असेल ती रक्कम देय ठरविले आहे. त्यानुसार जमीनीची किंमत अधिक असल्याने ती देय ठरविली आहे. त्यामुळे प्रपत्र-ई विवरणपत्रातील फळझाडे मूल्यांकन शुन्य दर्शविण्यात आली आहे.

(२) होय.

(३) मूल्यांकन संबंधित उप जिल्हाधिकारी भूसंपादन (इमारत व दळणवळण) बुलढाणा यांना सादर केलेले आहे. सदर मूल्यांकन प्रकरण सद्य:स्थितीमध्ये न्यायप्रविष्ट आहे.

(४) निरंक

\-----------

**पुणे शहरातील एमआयटी विश्वशांती विद्यापीठाकडून सहल शुल्क भरणेबाबत विद्यार्थ्यांवर दबाव टाकण्यात येत असल्याबाबत**

**(४२) ३२२९९ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात पुण्यातील एमआयटी विश्वशांती विद्यापीठाकडून बी-टेक अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२० -२०२१ या अंतिम वर्षाला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क आणि सहलशुल्क भरण्याबाबत विद्यापीठ व्यवस्थापनाकडून दबाव टाकण्यात येत असल्याचे माहे मे, २०२१ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या दबावाला कंटाळून दोन लाख रुपये सहल शुल्कापैकी दीड लाख रुपये अनेक विद्यार्थ्यांनी भरले आहेत, तसेच सहलशुल्क न भरणाऱ्या विद्यार्थ्यांचे बी-टेक अभ्यासक्रमाचा शैक्षणिक वर्ष २०२० -२०२१ या अंतिम वर्षाचे निकालही रोखून ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहलशुल्क रक्कम शैक्षणिक शुल्कामध्ये ग्राह्य धरण्याची मागणीही अनेक पालकांनी व्यवस्थापनाकडे केली आहे, तसेच पुण्यातील विविध विद्यार्थी संघटनांनी आंदोलन व निवेदनाद्वारे राज्य सरकारकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०६-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही, सर्व विद्यार्थ्यांना निकाल ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर जाहीर करण्यात आला आहे.
(३) १२७ विद्यार्थ्यांकडून सहल शुल्क हे शैक्षणिक शुल्कामध्ये ग्राह्य धरण्याची मागणी करण्यात आली होती. त्याप्रमाणे सदर रक्कम समायोजित करुन उर्वरित रक्कम संबंधितांना परत केलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हा केंद्रीय बँकेच्या मोठ्या थकबाकीदारांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असल्याबाबत**

**(४३) ३२३१६ (१२-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा केंद्रीय बँकेच्या मोठ्या थकबाकीदारांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रलंबित प्रकरणांमध्ये योग्य वकील न नेमणे, वसुली प्रक्रियेत त्रुटी ठेवणे, थकबाकीदारांना फायदा होईल अशी कार्यपद्धती अवलंबिण्यात येणे, असे प्रकार करून जिल्हा बँकेच्या वसुलीसाठी अधिकाऱ्यांकडून प्रयत्न न होता कर्ज वसुली प्रकरणात होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मोठ्या थकबाकीदारांकडून थकीत कर्जाची वसुली करणे तथा थकीत वसुली प्रकरणात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करणेची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पालकमंत्री तथा अन्न व औषधे प्रशासन मंत्री यांचेकडे दिनांक ९ मे, २०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाच्या अनुषंगाने दिरंगाई करणाऱ्या दोषीविरुध्द शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-११-२०२१) :** (१) होय.
(२) दि.बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या सहकारी बँकेच्या बिगर शेती विभागाचे वेगवेगळ्या न्यायालयात एकूण ९८ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

बँकेने माहे मे, २०१७ पासून करार तत्वावर दरमहा रु. २५,०००/- मानधन देऊन विधी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. त्यांचे नेमणूकीपासून ते सर्व न्यायालयीन प्रकरणावर स्वतः नियंत्रण ठेवतात व त्यामुळे सर्व न्यायालयीन प्रकरणांना गती प्राप्त झाली आहे व त्यांचे नेमणूकीपासून आतापर्यंत Negotiable Instrument Act चे कलम १३८ मधील प्रकरणे मिळून २०० पेक्षा जास्त प्रकरणे निकाली निघाली आहेत.

(३) होय.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

————————————

## राज्यातील समाज कल्याण विभागाच्या अखत्यारितील वसतीगृहात ठेकेदारांना भोजन कक्ष पुरविण्याबाबत

**(४४) ३२३१७ (१२-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाज कल्याण विभागाच्या अखत्यारितील वसतीगृहातील विद्यार्थ्यांना भोजन पुरविण्याकरीता ठेकेदारांना ठेकेदार पद्धतीने भोजनकक्ष देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाज कल्याण विभागाच्या वसतीगृहात विशेषत: पुणे जिल्ह्यातील वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या भोजनात अळ्या, किडे इत्यादी प्रकारच्या निष्कृष्ट दर्जाचे जेवण ठेकेदारांमार्फत पुरविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात येऊन समाजकल्याण विभागाच्या वसतीगृहातील विद्याथ्यांना सकस व उत्कृष्ट दर्जाचे भोजन मिळण्याकरीता योजनांमध्ये सुधारणा व नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी समाज कल्याण विभागाच्या विद्यार्थ्यांच्या वसतीगृहात सेंट्रल किचन योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०१-११-२०२१) :** (१)अंशत: खरे आहे.

४४१ शासकीय वसतिगृहांपैकी १०८ वसतिगृहांना विभागामार्फत (शासकीय मेस) भोजन पुरवठा करण्यात येतो, तर ३३३ वसतीगृहांना खाजगी भोजन पुरवठादारांमार्फत भोजन पुरवठा करण्यात येतो.

(२) व (३) होय.

पुणे जिल्हयातील मुलींचे शासकीय वसतीगृह, खडकवासला येथे जेवणामध्ये अळी आढळल्याची बाब निदर्शनास आली आहे. भोजन पुरवठादाराविरूध्द किरकोळ स्वरूपाची तक्रार असल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येते, तर गंभीर स्वरूपाची तक्रार असल्यास सबंधित भोजन पुरवठादाराचा भोजन पुरवठा रद्द करून त्याचे नाव काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येते. प्रकरणी सबंधित भोजन पुरवठादार मे.क्रिस्टल गौरमेंट प्रा.लि. मुंबई यांनी निकृष्ट दर्जाचे भोजन पुरविल्याने त्यांच्याविरूध्द रू.१.०० लक्ष इतका दंड आकारण्यात आला आहे.

शासनाने निश्चित केलेल्या मानकानुसार विद्यार्थ्यांना पुरेसे, दर्जेदार, ताजे, पोष्टीक आणि सुरक्षित आहार देऊन त्यांच्या भोजनाच्या अडचणी कमी करणे, त्यांचे सर्वांगीण आरोग्य सुधारणे, त्यांच्या शारिरीक, मानसिक आरोग्यात वृध्दी करून त्यांचे शैक्षणिक हीत जोपासण्याच्या दृष्टीने सेंट्रल किचन योजना लागू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

————————————

## चिखली येथील शासकीय जागा पिंपरी- चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयास हस्तांतरित करण्याबाबत

**(४५) ३२३२० (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील वाढत्या लोकसंख्येनुसार वाहनांची मागणी वाढत असून येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची जागा अपुरी पडत असल्याने पिंपरी-चिंचवड मनपा क्षेत्रातील चिखली येथील गट क्रमांक ५३९ मधील पेठ क्रमांक १३ येथील चार हेक्टर शासकीय जागा ही येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या विस्तारीकरणासाठी मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहनचालकांच्या सोयीकरिता त्या जागेवर ब्रेक टेस्ट ट्रॅक आणि वाहन तपासणी केंद्र सुरू करण्यात येणार असून कार्यालयाच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेली चिखली येथील सदर चार हेक्टर शासकीय जागा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे हस्तांतरित करण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे मंजुरी करता पाठवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०२-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

सन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्र. जमीन ३४१९/१५४३/प्र.क्र.२९९/ज-दि. १९.०३.२०२० अन्वये सदर जमीन शासनाने मंजूर केली आहे.

(३) जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि.०२.१०.२०२० रोजी आदेश निर्गमित केले असून जमिनीचा ताबा घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) लागू नाही.

---

## शिक्षण विभागातील प्रशिक्षण शाखेतील अधिकाऱ्यांच्या बदल्या प्रशासन शाखेत आंतरबदलीद्वारे होणेबाबत

**(४६) ३२३३० (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण सेवेत प्रशासन व प्रशिक्षण (शिक्षण सक्षमीकरण शाखा) अशा दोन शाखा कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत प्रशासन शाखेत गटशिक्षणाधिकारी, शिक्षण अधिकारी, उपसंचालक, सह संचालक, अशी अनेक पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शालेय शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रशासन व शिक्षण सक्षमीकरण या दोन्ही शाखांचे एकत्रीकरण करून प्रशासन शाखेतील रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघ (शिक्षण सक्षमीकरण शाखा) यांनी स्वयंस्पष्ट निवेदनाद्वारे शासनाकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर एकत्रीकरणामुळे शासनाला पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होऊन शासनाचा आर्थिक भार कमी होण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाच्या बहुतांश विभागामध्ये एकत्रित प्रशिक्षण व प्रशासन शाखा प्रमाणे शिक्षण विभागात आंतरबदली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

————————————

**राज्यात तासिका (सीएचबी) धोरण बंद करणेबाबत**

**(४७) ३२३५६ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात केंद्र व राज्य शासनाने आर्थिक नुकसानमुळे तासिका तत्वावर (सीएचबी) धोरण सुरू केले असून उच्च शिक्षित मनुष्यबळ कमी असल्याची बाब माहे मार्च, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत १० वर्षे भरती प्रक्रियाच थांबविली असल्याने राज्यात लाखो सहाय्यक सहयोगी प्राध्यापक यांची पदे रिक्त असून तासिका तत्वावरील प्राध्यापक अल्प वेतनावर काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्येक वर्षी सेट-नेट उत्तीर्ण होणाऱ्यांमध्ये मोठी भर पडत असल्यामुळे उच्च विद्याविभूषितांना वेठबिगाराची (वेटर, मॅनेजर, तसेच रस्त्यावर पुस्तके विकणे, गॅस वितरण करणे) अशी कामे करावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाविद्यालय व विद्यापीठात १०० टक्के प्राध्यापक भरती करावी, तासिका धोरण पूर्णत: बंद करावे, कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट झाल्यानंतर सीएचबी अनुभव ग्राह्य धरण्यात यावा, जादा कार्यभारासाठी अर्धवेळ कायमस्वरूपी प्राध्यापक पदाची निर्मिती करावी, विनाअनुदानित महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान द्यावे आदी प्रमुख मागण्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही
(२) हे खरे नाही.

दिनांक १/१०/२०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या ११७१ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांत सहाय्यक प्राध्यापकांच्या अनुज्ञेय ३११८५ पदांपैकी २२२३६ पदे भरलेली असून ८९४९ पदे रिक्त आहेत. तसेच माहे मार्च २०२०-२१ अखेर १२ अकृषी व ३ अभिमत विद्यपीठे अशा एकंदरीत १५ विद्यापीठांमध्ये एकूण २६०० शिक्षकीय पदे मंजूर असून १३२९ पदे भरलेली आहेत व १२७१ पदे रिक्त आहेत.

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या तात्पुरत्या नियुक्त्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात येत असून, याबाबत शासनाच्या दिनांक १४/११/२०१८ च्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येते. सदरची नियुक्ती ही प्रत्यक्ष उपलब्ध कार्यभार तपासून एका पूर्णवेळ रिक्त पदाकरीता फक्त दोनच अध्यापकांना एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात केली जाते आणि तदनंतर सदरची नियुक्ती आपोआप संपुष्ठात येते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) हे खरे आहे.

राज्यातील अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील मोठया प्रमाणावर रिक्त असलेल्या शिक्षक / शिक्षकेत्तर पदांपैकी सहाय्यक प्राध्यापकांची ४० % म्हणजेच ३५८० पदे भरण्यास उच्चस्तरिय समितीने मान्यता दिलेली आहे. यानुसार दिनांक ०३/११/२०१८ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, त्यानुसार पदभरतीची प्रक्रिया सुरू होती. परंतु कोविड १९ च्या संसर्गजन्य रोगामुळे उदभवलेल्या परिस्थितीत वित्त विभागाच्या दिनांक ४/५/२०२० च्या आदेशान्वये निर्बंध जारी करण्यात आल्याने सद्य:स्थितीत वरील भरतीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. तथापि सदरची पदे न भरल्यास होणारा परिणाम लक्षात घेता, उक्त खंडीत झालेली भरती प्रक्रिया वित्त विभागाच्या सहमतीने शासनाच्या दिनांक १२/११/२०२१ च्या आदेशान्वये सुरू करण्यात आलेली आहे.

यासंदर्भात शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ७/१०/२०२१ च्या शासन निर्णयानुसार विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेऊन त्याअनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण , पुणे यांच्या अध्यक्षतेखाली संबधित लोकप्रतिनिधी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या समितीचे गठण करण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करोना संसर्गामुळे आजमितीपर्यंत मृत्युमुखी पडलेल्या कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई अदा करण्याबाबत

**(४८) ३२३९८ (१७-०९-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या वीज कंपन्यांमधील रिक्त असलेल्या नियमित पदांच्या जागी गत १५ ते २० वर्षांपासून तब्बल ३२ हजारांहून अधिक कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून करोना संसर्गामुळे आजमितीपर्यंत ४० कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना संसर्गामुळे मृत झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना आजमितीपर्यंत संबधित वीज कंपन्यांनी नुकसान भरपाई दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने वीज कंपन्यांतील करोना संसर्गामुळे मृत झालेल्या कंत्राटी कामगारांच्या कुटुंबियांना तातडीने नुकसान भरपाई अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-११-२०२१) :** (१) राज्यातील महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तीन वीज कंपन्यांमधील रिक्त असलेल्या नियमित पदांच्या जागी एकूण इतके ३९,७५३ कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी आजमितीपर्यंत १२४ कर्मचाऱ्यांचा करोना संसर्गामुळे मृत्यु झाला आहे.

(२) व (३)

अ) महावितरण कंपनीमध्ये माहे जून, २०२१ अखेर करोना संसर्गामुळे मृत झालेल्या ३८ कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी २६ कंत्राटी कामगारांच्या कुटुंबीयांना सानुग्रह सहाय्य अदा करण्यात आले आहे. उर्वरीत १२ मृत कंत्राटी कामगारांच्या कुटुंबीयांना सानुग्रह सहाय्याची रक्कम अदा करण्याबाबत कंपनी स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.

ब) महानिर्मिती कंपनीत माहे. जुन, २०२१ पर्यंत करोना संसर्गामुळे मृत झालेल्या ६६ कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी २५ कंत्राटी कामगारांच्या कुटुंबीयांना सानुग्रह सहाय्य अदा करण्यात आले आहे. ३८ मृत कंत्राटी कामगारांच्या वारसदारांना सानुग्रह सहाय्य अदा करण्याची कार्यवाही कंपनी स्तरावरून सुरू आहे. ३ प्रकरणे अटी व शर्तींची पुर्तता न केल्यामुळे अपात्र ठरली आहेत.

क) महापारेषण कंपनीतील एकूण २० मृत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ४ मृत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वारसांना सानुग्रह सहाय्य अदा करण्यात आले आहे. उर्वरीत प्रकरणांमध्ये मृत कंत्राटी कामगारांच्या वारसदारांना सानुग्रह सहाय्य अदा करण्याची कार्यवाही कंपनी स्तरावरून सुरू आहे.

(४) लागू नाही.

-----------

## राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या वेतनाबाबत

**(४९) ३२३९९ (२३-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांना गेले अनेक महिने संस्थांनी वेतन दिले नसल्याची बाब दिनांक २५ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०६-१२-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

कायम विना अनुदानित महाविद्यालयामधील कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबधित संस्थेची आहे.

तथापि, कोविड-१९ च्या महामारीच्या काळात राज्यातील विद्यापीठ संलग्नित असलेल्या विना अनुदानित महाविद्यालयांतील तसेच अनुदानित महाविद्यालयातील विना अनुदानित विभागातील शिक्षकांच्या वेतनाबाबतच्या तक्रारी काही विद्यापीठांस प्राप्त झाल्या असून, या तक्रारीबाबत विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांची सत्यशोधन समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने संबधित महाविद्यालयांना / संस्थांना तक्रारकर्ते शिक्षकांविरूध्द कोणतीही दंडात्मक कारवाई न करता त्यांना देय होणारे वेतन / थकीत वेतन त्वरीत अदा करण्याबाबत विद्यापीठ स्तरावरून सूचीत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------

## सहकार विभागात रिक्त झालेली पदे तातडीने भरणेबाबत

**(५०) ३२४१५ (१५-०९-२०२१). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहकार विभागात मंजूर असलेल्या २२५ पदां पैकी १०० पदे रिक्त होत असून त्यापैकी १०३ पदे आधीच रिक्त असल्याची बाब दिनांक १८ मे २०२१ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे का,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा येत आहे त्याचे थोडक्यात स्वरूप काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२२-१०-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्यात सहकार विभागातील सहाय्यक निबंधकांची ४५१ पदे मंजुर असून सरळसेवा कोटयात २२५ तर पदोन्नती कोटयात २२६ पदे उपलब्ध आहेत. सन २०२० करिता सरळसेवा कोटयातील १९ पदांची जाहीरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आली असुन, सन २०२१ करिता सहाय्यक निबंधक गट-ब १८ पदांचे मागणीपत्र दि.३०.९.२०२१ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आले आहे. तसेच पदोन्नती कोटयातील ५० पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**<br>**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**<br>**प्रधान सचिव,**<br>**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.